दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ शनिवार, २५ एप्रिल २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : ०९ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाबाबत निवेदन स्वीकारण्यास मुदतवाढ

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने अर्ज किंवा निवेदने सादर करण्यासाठीची मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती सामाजिक न्याय विभागाने प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण संदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने शिफारशींसह १६ मार्च २०२६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला होता. या अहवालावर पुढील कार्यवाहीसाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या १० एप्रिल २०२६ च्या प्रसिद्धीपत्रकान्वये, संबंधितांना आपल्या मते मांडण्यासाठी १५ एप्रिल २०२६ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती तसेच सुनावणी १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार होती.मात्र, सामाजिक संघटना तसेच विविध स्तरांतून कालावधी अपुरा असल्याने मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार, dg-sw@barti.in या ई-मेल आयडीवर अर्ज किंवा निवेदन सादर करण्यासाठी आता ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

# आम आदमी पक्षात मोठी फूट

## राघव चड्ढा भाजपामध्ये सामील, दोन-तृतीयांश खासदारांचा पाठिंबा असल्याचा दावा

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षात (आप) फूट पडली आहे. आपचे खासदार राघव चड्ढा यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राघव चड्ढा यांच्यासह खासदार संदीप पाठक आणि खासदार अशोक मित्तल यांनी देखील भाजपात प्रवेश केला आहे. संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासोबत पत्रकार परिषदेला संबोधित करताना खासदार राघव चड्ढा यांनी सांगितलं की, "राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे दोन-तृतीयांश सदस्य म्हणून आम्ही भारताच्या संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपामध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे."

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून राघव चड्ढा हे भाजपामध्ये सामील होणार असल्याची चर्चा सुरू होती. अशात आता राघव चड्ढा यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसंच हरभजन सिंग, स्वाती मालीवाल, राजिंदर गुप्ता आणि विक्रम साहनी हे देखील आपल्यासोबत येतील, असा दावा राघव चड्ढा यांनी केला आहे. ते म्हणाले, "राज्यसभेत आम आदमी पक्षाचे 10 खासदार




आहेत, त्यापैकी दोन-तृतीयांशाहून अधिक आमच्यासोबत आहेत. त्यांनी स्वाक्षरी केली असून, आज सकाळी आम्ही स्वाक्षरी केलेले पत्र आणि कागदपत्रे राज्यसभा अध्यक्षांकडे सादर केली आहेत. त्यापैकी तिघं तुमच्यासमोर उपस्थित आहेत. आमच्या व्यतिरिक्त हरभजन सिंग, राजिंदर गुप्ता, विक्रम साहनी आणि स्वाती मालीवाल हे देखील आहेत."

पुढं राघव चड्ढा यांनी सांगितलं की, "पक्षाच्या कार्यातून स्वतःला दूर ठेवण्यामागचं खरं कारण मी तुम्हाला सांगत आहे. मला त्यांच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी व्हायचं नव्हतं. मी त्यांच्या मैत्रीस पात्र नव्हतो, कारण मी त्यांच्या गुन्ह्यांमध्ये सामील नव्हतो. आमच्याकडे फक्त दोनच पर्याय होते. एकतर राजकारण सोडून गेल्या 15-16 वर्षांत केलेलं लोकसेवेचे काम सोडून देणं किंवा आमची ऊर्जा आणि अनुभव सकारात्मक राजकारणासाठी वापरणं. त्यामुळं आम्ही ठरवलं आहे की, भारतीय संविधानातील तरतुदींचा वापर करून राज्यसभेतील आपचे दोन-तृतीयांश सदस्य भाजपामध्ये विलीन होतील." दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी आपनं राज्यसभेतील आपल्या नेतृत्व रचनेत मोठा बदल करत राघव चड्ढा यांना उपनेतेपदावरून हटवलं होतं. एकेकाळी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सर्वात विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या राघव चड्ढा यांना अचानक राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवल्यामुळं राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आलं होतं.

## गोऱ्हे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप; युनायटेड वे मुंबई संस्थेचा उपक्रम

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर /वाडा:** तालुक्याच्या ग्रामीण भागात असलेल्या गोऱ्हे विद्यामंदिर या शाळेतील ४२ विद्यार्थ्यांना युनायटेड वे मुंबई या संस्थेच्या माध्यमातून देण्यात आलेल्या सायकलींचे वाटप वाड्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. संदीप चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

वाडा तालुक्यातील गोऱ्हे येथील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गोऱ्हे विद्या मंदिर या शाळेत सुंपोंडे, शेलटे, टकळी या गावांसह परिसरातील आदिवासी पाड्यांमधून दररोज ३ ते ८ किमी अंतरांची पायपीट करत हे विद्यार्थी शाळेत येत असतात. रोजच्या पायपीटीने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा मोठा परिणाम होत असे. शाळेच्या वेळेनुसार प्रवासाची कोणतीही साधने उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना









चालत शाळेत जाण्याने अनेक विद्यार्थिनीची शाळा सुटली होती. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहावेत या उद्देशाने युनायटेड वे मुंबई या संस्थेने हा सायकल वाटपाचा उपक्रम राबविला. युनायटेड वे च्या चिन्मय पाटील यांनी ग्रामीण - आदिवासी विद्यार्थ्यांची नेमकी गरज ओळखून दिलेल्या सायकलींमुळे केवळ शारीरिक उंचीच नाही तर शैक्षणिक उंची देखील वाढेल, असे म्हणत उपविभागीय अधिकारी चव्हाण यांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

यावेळी निवृत्त तहसीलदार भगवान अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक विनोद भोईर, युनायटेड वे मुंबई संस्थेचे चिन्मय पाटील, शिक्षकवृंद, पालक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मॅरेथॉनच्या माध्यमातून निधी संकलन

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणी सोडविण्याच्या हेतूने युनायटेड वे मुंबईचे सहाय्यक व्यवस्थापक चिन्मय पाटील यांनी टाटा मुंबई मॅरेथॉन २०२६ दरम्यान आवाहन केले होते. त्यामाध्यमातून निधी उभारला. या शैक्षणिक उपक्रमासाठी असंख्य दात्यांनी योगदान दिले. या उपक्रमाच्या अंमलबजावणीत युनायटेड वे मुंबईचे सहाय्यक व्यवस्थापक चिन्मय पाटील, जयराज सूर्यवंशी यांनी विशेष प्रयत्न केले.

## मेळघाटातील महिलांना पाण्यासाठी संघर्ष

### महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलन करणाऱ्या नेत्या यावरही आवाज उठवतील का? : राहुल येवले जिल्हा अध्यक्ष युवक काँग्रेस

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अमरावती प्रतीक्षा वासनिक :-** आज एकीकडे महिला विधेयक पारित करण्याच्या आडून डी लिमिटेशन बिल पारित करण्याच्या प्रयत्नाविरोधात आंदोलन सुरू आहे. मात्र दुसरीकडे मेळघाट भागात महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी धडपड करावी लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे सत्ताधाऱ्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी केला आहे.

मेळघाटातील दहेंद्री या गावामध्ये मागील १५ दिवसांपासून पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाण्याच्या प्रश्नामुळे संतप्त झालेल्या गावातील महिलांनी ग्रामपंचायतीवर मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

या संदर्भात प्रशासन पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. अपूर्ण काम असतानाही पाणीपुरवठा विभागाला ग्रामपंचायतीची नाहरकत कशी मिळते? असा सवालही युवक काँग्रेसने उपस्थित



केला आहे. हा संपूर्ण प्रकार युवक काँग्रेसने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला असतानाही आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

या प्रकरणात संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांची मिलिभगत असल्याचा संशय व्यक्त होत असून याची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी केली आहे. तसेच महिलांच्या प्रश्नांवर राजकारण करणाऱ्या सत्ताधारी पक्षाच्या महिला नेत्या मेळघाटातील पाण्याच्या समस्येवरही आंदोलन करतील का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

यावेळी राहुल येवले जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस अमरावती संदीप मुंडे तालुका अध्यक्ष लताबाई येवले मिथिया मुंडे अनिता भांवरें सोनकु घुमारे गीता मुंडे आशा येवले बजीबाई येवले मालती मुंडे दिलीप पोटे पंढरी येवले कमलेश घुमारे नामदेव घुमारे कुलदीप येवले रवी घुमारे विजय येवले महादेव साठे अनिकेत भावरे सुरेंद्र बेलकर व गावकरि उपस्थित होते

## ठाणे ग्रामीण पोलीस विभागातील शितल खरटमल यांना नीती आयोगाचा "भारत विभूषण"राष्ट्रीय पुरस्कार

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,(सुनील झळके) :** नीती आयोगातर्फे उदयपूर येथे सुमो रेसलिंग- स्पर्धेमध्ये डबल एशियन मेडल प्राप्त करणाऱ्या ठाणे ग्रामीण पोलीस विभागातील खेळाडू,ठाणे जिल्ह्याच्या व महाराष्ट्रातील एकमेव महिला आंतरराष्ट्रीय खेळाडू शितल मल्लिकार्जुन खरटमल यांना उदयपूर येथे "भारत विभुषण" या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले सदर प्रसंगी राजस्थान विधान परिषदेचे व्हॉइस सेक्रेटरी सारंगदेवोत, इंडियन आर्मी लेफ्टनंट जनरल एन.के. सिंग, ग्लोबल प्रेस्टेज नारायण सेवा संस्थाचे अध्यक्ष प्रशांत अग्रवाल हस्ते नुकताच सन्मानित करण्यात आले. पोलीस विभागातील शितल सारख्या गुणी खेळाडू मिळविलेल्या या पुरस्कारा बद्दल संजय दराडे




(आईजी कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई) यांनी तिने मिळवलेल्या या यशाबद्दल व स्पर्धेतील नेत्रदीपक कामगिरी केल्याबद्दल पोलीस विभागाचे नाव भविष्यातही उज्वल करण्यासंबंधी शुभेच्छा व्यक्त करत तिचा यातच विभागाच्या वतीने सन्मान करण्यात आला. शितल खरटमल यांच्या क्रीडा क्षेत्रातील यश संपादनाने ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के,रवींद्र पाठक, सुधीर कोकाटे (नगरसेवक) इत्यादी मान्यवरांनी तिचा सन्मान करीत भविष्यातील क्रीडा क्षेत्रातील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

# आबिटघर विद्यालयाचे स्व.शंकर फकीर पाटील विद्यालय नामकरण

## सभागृह स्व.अरविंद शंकर पाटील यांचे नाव

## स्व.शंकर फकिर पाटील, आबिटघर यांच्या परिवाराकडून देणगी

महाराष्ट्र जीत

**भिवंडी, (सुनील झळके) :** वाडा तालुक्यातीत मौजे आबिटघर येथील विद्यालयाचे व विद्यालयातील सभागृहाचे नामकरण करण्यात आले असून, या अगोदर आबिटघर विद्यालय गावाने ओळखण्या जाणा-या विद्यालयाचे नाव आता 'स्व.शंकर फकीर पाटील विद्यालय' तसेच विद्यालयाच्या सभागृहाचे नांव "स्व.अरविंद शंकर पाटील सभागृह" असे करण्यांत आले आहे. हा नामकरण सोहळा नुकताच आबिटघर येथे पार पडला. कार्यक्रमासाठी कुणबी सेनाप्रमुख विश्वनाथ पाटील,




ज्येष्ठ समाजनेते परशराम सावंत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल पाटील, पंचायत समिती माजी सभापती जगदीश पाटील, समाजनेते हरी दामा पाटील, संस्थेचे अध्यक्ष एकनाथ वेखंडे, सचिव व मुख्याध्यापक दिलीप पुंडलीक पाटील यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.आबिटघर विद्यालयाचे नामकरण करण्यांसाठी स्व. शंकर फकीर पाटील यांचे पुत्र व संस्थेचे माजी अध्यक्ष विकास शंकर पाटील, सुनबाई संध्या सुहास पाटील, व ॲड ,स्व. प्रकाश पाटील यांची मुलगी मुग्धा प्रकाश पाटील उर्फ मुग्धा निलेश देसाई यांचेकडून भरीव मदत देण्यात आली.

तसेच स्व. अरविंद शंकर पाटील यांच्या पत्नी अश्विनी अरविंद पाटील व पुत्र अनिकेत अरविंद पाटील यांचेकडून विद्यालयाला भरीव मदत देण्यांत आली असून, विद्यालयाच्चा सभागृहाचे नांव "''स्व.अरविंद शंकर पाटील सभागृह" असे करण्यात आले.

स्व. शंकर फकीर पाटील हे वाडा पंवायत समितीचे पहिले सभापती व उच्चविद्याविभूषीत होते स्व.अरविंद शंकर पाटील हे महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण होवून, रेंज फॉरेस्ट ऑफिसर' म्हणून त्यांची निवड झाली होती. विद्यालयाचे नाव पुनस्थापित व सभागृहाचे नामकरण करण्यांत आल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत असून त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## संपादकीय

### एप्रिलातील ‘फूल’!

एप्रिल महिन्याची केवळ पहिलीच तारीख नव्हे; तर अन्य दिवसही अनेकांतील शहाणपणाच्या अभावाचे प्रदर्शन घडवतात. सुमारे ६५ वर्षांपूर्वी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांना याच महिन्यात अवदसा आठवली आणि शेजारील क्युबा या देशात आपण सैन्य पाठवून सत्ताबदल घडवण्याची इच्छा निर्माण झाली. त्याआधी त्यांचे पूर्वसुरी जनरल ड्वाईट आयसेनहॉवर यांनी असे करता येऊ शकते असे छातीठोकपणे सांगितले होते. तो शीतयुद्धाचा तप्त काळ. त्यामुळे क्युबा देशातील फिडेल कॅस्ट्रो यांचे सत्तापदी असणे अमेरिकेच्या डोळ्यात खुपत होते. त्यात वर आपण काहीही करू शकतो असा भ्रम. त्यातूनच केनेडी यांनी क्युबात पॅराट्रूपर्स घुसवले. पण तीन दिवसांतच त्यांना आपल्या चुकीची जाणीव झाली. क्युबात सत्ताबदल राहिला बाजूला, केनेडी यांस अमेरिकेची अब्रू वाचवत माघार घ्यावी लागली. इतिहासात नोंदले गेलेले ‘बे ऑफ पिग्ज’ प्रकरण ते हेच. स्वदेशीच्या या इतिहासातून अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही धडा घेतला नाही. म्हणून तो त्यांना आता याच महिन्यात इराण या देशाकडून शिकावा लागला. इराणशी सुरू असलेल्या शस्त्रसंधीची मुदत त्यांनी ऐन वेळी वाढवली. ही अशी तिसरी मुदतवाढ. आधीच्या दोन घटनांप्रमाणे मुदत संपण्यास काही तासांचा अवधी उरलेला असताना त्यांनी हा शस्त्रसंधी आपण वाढवत असल्याचे जाहीर केले. अगदी त्याआधी आपण असे काही अजिबात करणार नाही असे स्पष्ट करत इराणला घाबरवू पाहणाऱ्या ट्रम्प यांना स्वत:च ही मर्दुमकी गुंडाळून ठेवावी लागली आणि हा युद्धविराम तात्पुरता वाढवावा लागला.

ही ट्रम्प यांची असहायता. ती इराणने पूर्णपणे हेरली असून अमेरिकेच्या दबावास अजिबात न जुमानता ताठ उभे राहून अमेरिकेचा घाम काढण्याचा त्यांचा इरादा त्यातून स्पष्ट दिसतो. आपण होर्मुझची खाडी ताब्यात घेऊ, इराणचे अणुइंधन परत घेऊ, त्या देशाची राखरांगोळी करू इत्यादी वल्गनांनंतर ट्रम्प यांना एक प्रकारे इराणसमोर नांगी टाकावी लागली. खरे तर त्यात अजिबात आश्चर्य नाही. हे असेच होणार होते. ‘लोकसत्ता’ने गेल्या महिन्याभरातील विविध संपादकीयांतून इराण म्हणजे व्हेनेझुएला नव्हे, हा देश ट्रम्प यांच्यासमोर अजिबात शरणागती पत्करणार नाही, उलट ट्रम्प यांच्याच नाकीनऊ आणेल असे म्हटले होते. तसेच होताना दिसते. ते तसे होईल याच्या खुणा खरे तर सर्वत्र दिसत होत्या. स्वत:च्या मदमस्तीत गुंग ट्रम्प यांना त्या दिसल्या नाहीत. परिणामी त्यांच्यावर हे असे हसे करून घेण्याची वेळ आली. अमेरिकेने आमच्या जहाजांची केलेले नौदल-नाकेबंदी दूर होत नाही, तोपर्यंत आम्ही अमेरिकेशी चर्चाच करणार नाही, अशी स्वच्छ भूमिका इराणने घेतली. इतकेच नव्हे तर ती आजतागायत टिकवून ठेवली. इराणने ते तसे केले नसते, म्हणजे अमेरिकेच्या दबावास बळी पडून पाकिस्तानातील चर्चेत सहभाग घेतला असता तर ती एक प्रकारे शरणागती ठरली असती. निदान तसे मानले गेले असते. इराणने ते अजिबात होऊ दिले नाही. त्यांनी अमेरिकेस आणखी ताणण्याचा निर्णय घेतला. एरवीच्या शहाणपणात तुटेपर्यंत ताणू नये असे सांगितले जाते. इराण बरोब्बर याच्या उलट करताना दिसतो. असे केल्याने जो काही संवादधागा आहे तोही तुटेल याची जाणीव इराणला नसेल असे नाही. तरीही अशी ताठर भूमिका तो घेतो. याचे कारण असे केल्याने हा संवादसेतू खरोखरच तुटला तर त्याचा भौतिक फटका इराणला बसणार असला तरी झाल्या प्रकाराचा नैतिक झटका हा फक्त आणि फक्त अमेरिकेलाच बसणार, हे स्वच्छ आहे.

कारण इराणकडे आता गमावण्यासारखे काही नाही. अमेरिकेने नव्याने हवाई हल्ले केल्यास आणखी काही पूल, इमारती, धरणे, वीज प्रकल्प इत्यादी जमीनदोस्त होतील आणि काही शेकड्यांचे प्राण जातील. ते तसेही गेलेले आहेत आणि स्थावर मालमत्ताही उद्‌ध्वस्त झालेल्या आहेत. तेव्हा अमेरिका आणखी करून काय करणार, असा हिशेब इराणने केला नसेलच असे नाही.

# आर्या प्रकल्पांतर्गत कृषी विज्ञान केंद्रात अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान प्रशिक्षण आयोजित

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे भारतीय कृषी अनुसंधान परिषद प्रायोजित आर्या (ARYA - Attracting and Retaining Youth in Agriculture) प्रकल्पांतर्गत “वैज्ञानिक अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान व मूल्यवर्धन” या विषयावर दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. ग्रामीण युवक, महिला आणि शेतकरी यांना कृषीआधारित उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे, प्रक्रिया उद्योगाविषयी तांत्रिक ज्ञान देणे आणि स्वयंरोजगारास चालना देणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर. एल. काळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शेतमालाचे मूल्यवर्धन (Value Addition) केल्यास उत्पादनाची बाजारातील स्पर्धात्मकता वाढते तसेच उत्पादकांना अधिक लाभदायक दर मिळू शकतो. कृषी प्रक्रिया उद्योग हा ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रभावी पर्याय असून, युवकांनी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या (MSME) माध्यमातून







या क्षेत्रात पुढाकार घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

प्रशिक्षण समन्वयक शुभांगी वाटाणे यांनी अन्न प्रक्रिया उद्योगातील विविध व्यवसाय संधींची सविस्तर माहिती दिली. त्यांनी मसाला प्रक्रिया, धान्य व कडधान्य प्रक्रिया, फळे व भाजीपाला प्रक्रिया तसेच सोयाबीन आधारित उत्पादन निर्मिती यांवर तांत्रिक मार्गदर्शन केले. विशेषतः मसाला प्रक्रिया उद्योगावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करताना मसाल्यांचे वैज्ञानिक प्रमाणन, नियंत्रित भाजणी प्रक्रिया, स्वच्छता व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग तंत्रज्ञान आणि उत्पादनाची शेल्फ लाईफ वाढविण्याच्या आधुनिक पद्धती यांचे सखोल मार्गदर्शन केले. तसेच घरगुती उद्योगातून व्यावसायिक स्तरावरील उत्पादन युनिट कसे विकसित करता येईल, याविषयीही त्यांनी माहिती दिली.

विषय विशेषज्ञ डॉ. सुधीर देशमुख यांनी आधुनिक अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करताना FSSAI मानके, अन्न सुरक्षितता, स्वच्छता निकष (Hygiene Standards) आणि दर्जा नियंत्रण प्रणाली यांवर भर दिला. उत्पादनाची विश्वासार्हता टिकवण्यासाठी प्रक्रिया साखळीत गुणवत्ता व्यवस्थापन अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच ब्रँडिंग, लेबलिंग आणि बाजारपेठेतील प्रभावी विपणन तंत्रांबाबतही मार्गदर्शन केले.

कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले यांनी अन्न प्रक्रिया उद्योगातील आर्थिक व्यवस्थापनावर मार्गदर्शन करताना प्रारंभिक भांडवली गुंतवणूक, उत्पादन खर्च, नफा-तोटा विश्लेषण, बाजारातील मागणीचे मूल्यांकन, किंमत निर्धारण तसेच उपलब्ध शासकीय योजना व अनुदानांची माहिती दिली. योग्य आर्थिक नियोजन, जोखीम व्यवस्थापन आणि विपणन कौशल्य यांच्या साहाय्याने लघुउद्योग यशस्वी होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

पशुविज्ञान विषय विशेषज्ञ डॉ. मयूर देशमुख यांनी पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध प्रक्रिया, मांस प्रक्रिया आणि अंडी प्रक्रिया उद्योगांची माहिती दिली. दूधापासून पनीर, दही, तूप, फ्लेवर्ड मिल्क यांसारखी मूल्यवर्धित उत्पादने तयार करून शेतकरी उत्पन्नात लक्षणीय वाढ करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रक्षेत्र व्यवस्थापक प्रमोद देशमुख यांनी प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक कच्च्या मालाची सातत्यपूर्ण उपलब्धता, शेतमालाचे वैज्ञानिक साठवण व्यवस्थापन, प्रक्रिया युनिटसाठी आवश्यक जागा, यंत्रसामग्री निवड, तसेच प्रत्यक्ष अंमलबजावणीतील तांत्रिक बाबी यांवर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी शेतकरी, महिला बचत गट सदस्य आणि ग्रामीण युवक-युवतींना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवकांना अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून स्वावलंबन, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि कृषी उत्पादनांना अधिक बाजारमूल्य मिळवून देण्याच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. प्रशिक्षणाचे संचालन शुभांगी वाटाणे तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण बावस्कर यांनी केले.

## आंतरराष्ट्रीय मास्टर अथेलेटिक्स स्पर्धेमध्ये नाशिकच्या सौ नलिनी मधुकर कड यांनी सहभाग नोंदवून भारताला तीन सुवर्णपदकासह विजेतेपद मिळवून भारताचा ध्वज जागतिक स्तरावर फडकवला



## नगरसेवक कैलास मुदलियार यांचे हस्ते सत्कार

महाराष्ट्र जीत

**नाशिक रोड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** थायलंड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय मास्टर अथॅलेटिक्स स्पर्धेमध्ये आपल्या नाशिक च्या सौ. नलिनी मधुकर कड यांनी सहभाग नोंदवून आपल्या भारताला 3 सुवर्ण पदकासह विजेतेपद मिळवून दिले आपल्या भारताचा ध्वज त्यांनी जागतिक स्तरावर फडकवला.

थायलंडच्या पट्ट्याला स्टेडियम मध्ये झालेल्या स्पर्धेमध्ये सौ नलिनी मधुकर कड यांनी 1500 मीटर 9 मिनिटात 800 मीटर 4 मिनिट 1 सेकंदात व 400 मीटर 2 मिनिटात पूर्ण केले या तिन्ही स्पर्धेत त्यांनी भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. या निमित्ताने आज नगरसेवक कैलास अण्णा मुदलियार यांनी सौ. नलिनी मधुकर कड यांचा सत्कार केला यावेळी निवृत्त पोलीस अधिकारी मधुकर कड साहेब हे देखील उपस्थित होते.

## गोदा ते नर्मदा जलयात्रेसाठी अडान नदीचे जल कलश शिर्डी कडे रवाना

महाराष्ट्र जीत

**मनीष भेलांडे कारंजा:-** राज्याच्या जलसंपदा विभागाद्वारे १५ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६’ साजरा केला जात आहे.जलव्यवस्थापन अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि जनसहभागातून प्रभावी करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवडा’ उपक्रमाअंतर्गत ‘गोदा ते नर्मदा’ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. लोकसहभाग आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा या जलयात्रेचा मुख्य उद्देश आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या दूरदर्शी व लोकाभिमुख कारभारातून प्रेरणा घेत राज्यात पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थान श्रीक्षेत्र चोंडी आणि गोदावरीचे उगमस्थान श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून एकाच वेळी या दोन ठिकाणांहून २५ एप्रिल २०२६ रोजी जलयात्रेचा शुभारंभ होणार



आहे. त्र्यंबकेश्वर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे.

या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील जल कलशांच्या माध्यमातून या उपक्रमात सहभाग नोंदविण्यात येणार आहे. प्रत्येक ठिकाणी लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत जल कलश स्वीकारून हे सर्व कलश शिर्डी येथे एकत्रित करण्यात येतील.

या अनुषंगाने दिनांक २३.०४.२०२६ रोजी माननीय आमदार श्रीमती सई ताई डहाके यांचे हस्ते अडाण नदी करिताचा पूजन करण्यात आलेला जल कलश कार्यकारी अभियंता, वाशिम पाटबंधारे विभाग, वाशिम यांचे कार्यालयाकडून स्वीकारून शिर्डी येथील संगम सोहळया करिता रवाना करण्यात येत आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे विभाग कारंजा व उपविभागीय तसेच शाखा कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची संपूर्ण चमू व शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांना विधान परिषदेत संधी द्यावी कार्यकर्त्यांची जोरदार मागणी

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खंदे समर्थक शिवसेना गटाचे नेते ओबीसी विजेएनटी चे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किशवे यांना शिवसेना पक्षाकडून आगामी विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात यावी अशी जोरदार मागणी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

ही मागणी अहिल्यानगर येथील ओबीसी नेते शिवाजी त्र्यंबक गजभार यांनी केली आहे गजभार यांनी सांगितले की बाळासाहेब किशवे हे सामान्य कुटुंबातून आलेले लढवय्ये नेते असून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात तळागाळातूनच केली आहे त्यांनी समाजासाठी वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन केले व गरजु रुग्नांना शिबिराच्या माध्यमातुन आजारावर निदान मिळवुन दिले आहे समाजाच्या हक्कासाठी अहोरात्र झटणारे लढवय्ये समाजसेवक म्हणुन प्रचीत आहेत महाराष्ट्र कर्णाटक राज्यात त्यांचा दांडगा लोक संपर्क असुन त्याचा फायदा पक्षाला नक्कीच होईल त्यांनी शिवसेनेची विचारधारा गावागावात आणि खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली आहे किशवे यांनी शिवसेना ओबीसीच्या माध्यमातून



गोरगरीब वंचित आणि मागासवर्गीय घटकांची मजबूत संघटना उभी केली आहे तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील विचारसरणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्यकर्त्यांची दखल घेऊन शिवसेना नेतृत्वाने आगामी विधान परिषद निवडणुकीत त्यांना उमेदवारी देऊन ओबीसी व विजेएनटी यांची घटकातील कार्यकर्त्यांना न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा गजभार व आनंद धुळगंडे,अनील धगनरे,अमोल गवते,ज्ञानेश्वर धुळगंडे,राम खरात,पवन धुळगंडे ,बालाजी थगनरे,मोहन थगनरे,हाणमंत डोरगळे,शंकर डेमाले,श्रीधर धुळगंडे आदी त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## देवळाली कॅन्टोन्मेंटमधील ब्रिटिशकालीन रस्त्यांची नावे बदलली; छत्रपती शिवरायांपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नावे

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प, प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील रस्ते व बाजारपेठांना असलेली ब्रिटिशकालीन नावे नामशेष करून त्याऐवजी राष्ट्रीय महापुरुषांची नावे देण्याचा ऐतिहासिक निर्णय कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती नामनिर्देशित सदस्य सचिन ठाकरे यांनी दिली.

केंद्र सरकारने देशभरातील ब्रिटिशकालीन खुणा नामशेष करण्याबाबत वेळोवेळी सूचना केल्या आहेत. त्यानुषंगाने देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे अध्यक्ष ब्रिगेडियर एन. आर. पांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक मनी त्रिपाठी व नामनिर्देशित सदस्य सचिन ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा महत्वपूर्ण ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

देवळाली कॅम्पची स्थापना ब्रिटिश सैन्याच्या तळासाठी झाली होती. त्यामुळे येथील रस्त्यांना इंग्रज अधिकाऱ्यांची नावे होती. तब्बल एका शतकाच्या कालावधीत हा बदल होत आहे. भारतीय संस्कृती, इतिहास आणि स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.



**#बदललेली नावे #**

जुने नाव, नवीन नाव

1)Lam Road छत्रपती शिवाजी महाराज मार्ग

2)Howson Road:- महात्मा गांधी मार्ग

3)Lawrence Road:- अहिल्याबाई होळकर मार्ग

4)Cannaught Road :-महात्मा ज्योतिबा फुले मार्ग

5)Haig Line :- शहीद भगतसिंग मार्ग

6)Rest Camp:- Road स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग

7)Levit Market:-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्केट

8)Cathey Cinema:- दादासाहेब फाळके मार्ग

15 दिवसांत नामफलक लागणार

पुढील 15 दिवसांत सर्व जुन्या पाट्या काढून नवीन नामफलक लावण्याचे काम पूर्ण होईल, असे स्पष्ट करण्यात आले.

**#नागरिकांना आवाहन #**

येत्या बैठकीत Barnes School Road, Napier Road, Cook Road या रस्त्यांच्या नामांतरावरही चर्चा होणार आहे. नागरिकांनी आपल्या घरपट्टी, पाणीपट्टी व प्रॉपर्टी कार्डावर बदललेल्या नावांची नोंद करावी. तसेच अजूनही काही रस्ते अथवा स्थळांची नामकरणे राहिली असल्यास सूचना कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाकडे कराव्यात, गुगल मॅप, पोस्ट, कुरिअर व शासकीय कागदपत्रांमध्ये नवीन नावे वापरावीत, असेही प्रशासनाने कळवले आहे.



**“ब्रिटिशांची गुलामगिरीची आठवण पुसून आपल्या महापुरुषांची नावे येणे ही अभिमानाची गोष्ट आहे,” या निर्णयाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.**

**सचिन ठाकरे,**
**नामनिर्देशित सदस्य**

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# किन्हीराजा दत्तक गाव सर्वांगीण विकासाचे आदर्श मॉडेल ठरेल - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## मनरेगाच्या बळावर किन्हीराजा दत्तक गावाचा सर्वांगीण विकास वेगात

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** किन्हीराजा या दत्तक गावात सर्व विभागांनी समन्वयाने काम करत विकासाची गती वाढवावी. जलसंधारण, कृषी, रोजगारनिर्मिती, पर्यटन आणि महिला सक्षमीकरण या सर्व घटकांचा समतोल साधत गावाचा सर्वांगीण विकास साधला तर हे गाव जिल्ह्यासाठी आदर्श मॉडेल ठरू शकते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.यावेळी उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, रोहयो उपजिल्हाधिकारी संजय नागटिळक,उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, मनरेगा जिल्हा समन्वयक निलेश घुगे यांच्यासह विविध यंत्रणा प्रमुखांची प्रमुख उपस्थिती होती.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दत्तक गाव म्हणून निवडलेल्या मालेगाव तालुक्यातील किन्हीराजा येथे विविध विभागांच्या समन्वयातून सर्वांगीण विकासाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून जलसंधारण, कृषी, पशुसंवर्धन, पर्यटन, महिला सक्षमीकरण, पायाभूत सुविधा आदी क्षेत्रांत ठोस कामांना गती मिळत आहे.१२ जानेवारी २०२६ नंतर गावात विकासकामांचा वेग वाढविण्यात आला आहे. एचडीएफसी बँकेच्या सीएसआर मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यासाठी पाच लक्ष सीएसआर निधीची मागणी केली आहे.इतर विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तर काही कामे लगेच सुरू करण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे. सेट्रीस या संस्थेच्या माध्यमातून वृक्षलागवड व बांबू लागवडीसाठी स्थळ निश्चिती करण्यात आली आहे. तसेच नव्या जॉब कार्डची नोंदणी, सक्रिय मजुरांचे ई-केवायसी पूर्ण करून मनरेगाअंतर्गत विविध कामांचे लोकेशन 'युक्तधारा' पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहे.

जलसंधारण व पायाभूत सुविधा विकासाला गती

गावातील मोठा व छोटा तलाव, तसेच सुमारे १४०० मीटर नालाखोलीकरण कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे.



जलसंधारण विभाग व जिल्हा परिषदेच्या अभियंत्यांनी तलावांची सध्यस्थिती, पाणीसाठा क्षमता व दुरुस्तीची आवश्यकता यांचा आढावा घेऊन प्रस्ताव सादर केले आहेत. 'नाम फाउंडेशन'च्या सहकार्याने हनुमान मंदिर तलाव, कमलेश्वर मंदिर तलाव आदी ठिकाणी जलसंधारण व मृदसंधारण कामांची पाहणी करून अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला आहे.

कृषी क्षेत्रात शाश्वततेकडे वाटचाल

कृषी विभागामार्फत शेततळ्यांसाठी व्यवहार्यता तपासणी, इच्छुक शेतकऱ्यांशी चर्चा, सेंद्रिय व नैसर्गिक शेती, कृषी यांत्रिकीकरण याबाबत मार्गदर्शन सुरू आहे. विविध कृषी योजनांची माहिती, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके व शेतकरी मेळावे आयोजित केले जात आहेत. फळबाग लागवडीसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजनही प्रस्तावित आहे.

पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसायाला चालना पशुसंवर्धन विभागाकडून 'पशु संजीवनी' शिबिराचे आयोजन करून जनावरांवर उपचार व जंतनाशक औषधांचे वितरण करण्यात आले. १०० टक्के लसीकरण मोहिम, दुग्ध उत्पादन वाढीसाठी जनजागृती, तसेच मांस उत्पादन वाढीसाठी उपाययोजना आणि वंध्यत्व निवारण शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन आहे. विदर्भ- मराठवाडा डेअरी डेव्हलपमेंट प्रकल्पाशी जोडण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.पर्यटन विकासासाठी महत्त्वाकांक्षी आराखडा वन विभागाच्या माध्यमातून कारेपूर्णा अभयारण्य परिसरात पर्यटन विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. पांडवलेणी टेकडी विकास, महादेव कुंड परिसरात सीएनबी कामे, वाहनतळ, तसेच झिपलाईन ॲडव्हेंचर यांसारख्या उपक्रमांची आखणी सुरू आहे. समृद्धी महामार्गाशी जोडणाऱ्या रस्त्यांबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.महिला सक्षमीकरण व रोजगारनिर्मितीला प्राधान्य

महिला व बालकल्याण विभाग आणि उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांना विविध उद्योग प्रशिक्षण देण्यात येत असून पापड, मसाला, शिवणकाम, ब्युटी पार्लर, किराणा व्यवसाय यांसारख्या उपक्रमांना चालना दिली जात आहे. उत्पादन गट व ग्रामसंघ स्थापन करून महिला सक्षमीकरणावर भर दिला जात आहे. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फतही सहकार्य दिले जात आहे.इतर विभागांचीही सक्रिय भूमिका क्रीडा विभागाकडून ओपन जिम, बंदिस्त व्यायामशाळा व रनिंग ट्रॅकसाठी प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. कामगार विभागाने बांधकाम कामगारांची नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. समाजकल्याण विभागाकडून दलित वस्ती विकास, स्मशानभूमी सुशोभीकरण व वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येत आहेत. आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी वस्तींसाठी मूलभूत सुविधा, संरक्षण किट व विविध योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.शिक्षण,मत्स्यव्यवसाय व इतर योजनांनाही चालना शिक्षण विभागाकडून शाळा विकास आराखडे, गुणवत्ता वृद्धी व विविध शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. मत्स्यव्यवसाय विभागाला गावात मत्स्य व्यवसाय वृद्धीसाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच बांधकाम व पंचायत विभागांमार्फत मनरेगाअंतर्गत अधिकाधिक कामे प्रस्तावित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांना देण्यात आलेल्या सूचनांची अंमलबजावणी सुरू असून काही कामांचे अहवाल प्रलंबित असले तरी किन्हीराजा गावाचा विकास आराखडा वेगाने आकार घेत आहे. सर्व विभागांच्या एकत्रित प्रयत्नातून हे दत्तक गाव लवकरच आदर्श विकास मॉडेल ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## रिक्षा–टॅक्सी चालकांसाठी 'मराठी अनिवार्य' निर्णयाला भारतीय मराठा संघाचा जाहीर पाठिंबा

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) मुंबई :** राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा आणि टॅक्सी परवानाधारक तसेच चालकांसाठी मराठी बोलणे अनिवार्य करण्याचा जो निर्णय जाहीर केला आहे, त्या निर्णयाचे 'भारतीय मराठा संघाने' जोरदार स्वागत केले आहे. या संदर्भात संघातर्फे एक जाहीर पत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून, या निर्णयाला पूर्णपणे पाठिंबा दर्शवण्यात आला आहे.

भारतीय मराठा संघाचे अध्यक्ष अविनाश पवार आणि सचिव एस.डी.पाटील यांनी स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्रात राहून व्यवसाय करणाऱ्यांना मराठी भाषा येणे ही काळाची गरज आहे. "मराठी अनिवार्य झालीच पाहिजे" ही आमची ठाम भूमिका असून, सरकारने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे.

परंतु, या निर्णयाच्या विरोधात जर कोणी मोर्चा काढण्याचा किंवा विरोध करण्याचा प्रयत्न केला, तर भारतीय मराठा संघ रस्त्यावर उतरून त्याचा तीव्र प्रतिकार करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

"जशास तसे उत्तर देऊ"

अशी आक्रमक भूमिका मांडताना संघाने म्हटले आहे की, "मराठी भाषा वापरण्यास कोणी




हरकत घेण्याचे धाडस करत असेल, तर त्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी भारतीय मराठा संघ सक्षम आहे." जे रिक्षा आणि टॅक्सी चालक मुजोरपणा दाखवतील, त्यांनी याची गंभीर नोंद घ्यावी, असा कडक इशाराही देण्यात आला आहे.

"पोट भरण्यासाठी आलात तर मापात राहा! नाहीतर चालते व्हा!" या पाठिंब्यामुळे आता हा विषय अधिक तापण्याची शक्यता असून, मराठी भाषेच्या मुद्द्यावरून येणाऱ्या काळात राजकीय आणि सामाजिक वातावरण अधिक आक्रमक होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा; घरकुल मुद्द्यावरून राजकारण तापले

महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर /सुभाष खडसे :** नगर पंचायत निवडणुका जवळ आल्याने राजकीय वातावरण तापू लागले असून, घरकुल लाभार्थ्यांच्या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत 2017ते 2021 या कालावधीत डीपीआर क्रमांक 1 ते 4 मधील सुमारे 932 लाभार्थ्यांच्या जवळपास 2 कोटी रुपयांचा निधी इतरत्र वळविल्याचा आरोप करत पालकमंत्र्यांकडे तक्रार सादर करून चौकशीची मागणी केली.




या आरोपांवर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी सविस्तर स्पष्टीकरण देत विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. संबंधित आर्थिक व्यवहार 2019 मध्ये झाला असताना त्या काळात आपण नगराध्यक्ष पदावर नव्हतो, असे स्पष्ट करत आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आपली प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.दोसानी पुढे म्हणाले की, या प्रकरणातील तक्रारीवर स्वाक्षरी करणारे दोन भाजप नगरसेवक हे देखील त्या काळात नगर परिषद सदस्य होते. तसेच, उपोषण करणाऱ्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या पत्नी त्या वेळी उपाध्यक्ष पदावर कार्यरत होत्या. त्यामुळे हा विषय केवळ राजकीय हेतूने पुढे आणला जात असल्याचा त्यांचा दावा आहे.घरकुल योजनेसाठी संबंधित एजन्सीची नियुक्ती ही ऑनलाईन टेंडर प्रक्रियेद्वारे करण्यात आली होती. या एजन्सीने नांदेड जिल्ह्यातील किनवट, भोकर, अर्धापूर आणि माहूर येथे डीपीआर तयार करणे व लाभार्थ्यांची कागदपत्रे संकलित करण्याचे काम केले असून, संबंधित नगर पंचायत व नगरपालिकांनी नियमानुसार देयके अदा केली आहेत, असेही त्यांनी नमूद केले.एजन्सी बोगस असल्याचा आरोप पूर्णपणे निराधार असून तो निवडणूक लक्षात घेऊनच केला जात असल्याचे सांगत, "चौकशी झाली तर सत्य समोर येईल आणि दूध का दूध, पाणी का पाणी होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, पहिल्या डीपीआरमधील काही लाभार्थ्यांना अंतिम हप्ता अद्याप मिळालेला नसून, त्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. प्रशासनाकडून काही त्रुटी राहिल्या असतील तर त्याची चौकशी व्हावी, मात्र पात्र लाभार्थ्यांना लवकरच थकीत रक्कम वितरित केली जाईल, असेही दोसानी यांनी स्पष्ट केले.नवनिर्माण महिला बहुउद्देशीय संस्था, अकोला या संस्थेला बोगस ठरविण्याचा आरोपही फेटाळण्यात आला असून, संबंधित संस्थेला विविध ठिकाणी कामे देण्यात आलेली असल्याचे त्यांनी नमूद केले.

## श्री बालाजी नगर नामफलकाचे अनावरण उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर : - सुभाष खडसे**

शहरातील माहूर–पुसद मार्गावरील वार्ड क्र.13 मधील लोकवस्ती परिसरातील नागरिकांनी एकत्र येत आपल्या भागाचे नामकरण "श्री बालाजी नगर" असे करण्याचा निर्णय घेतला. या नव्या नामकरणाचा अधिकृत प्रारंभ म्हणून नगराच्या नामफलकाचे अनावरण दि.22 एप्रिल रोजी उत्साहात पार पडले.

या नामफलकाचे अनावरण माहूर नगरीचे युवा नेतृत्व, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामुने



यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण होते. स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी जेष्ठ नागरिक वसंतराव चव्हाण, भाजप नेते सुमितभाऊ राठोड, हिरासिंग चव्हाण, शंकर जयस्वाल, सियाराम जयस्वाल, सुरेश गिऱ्हे, रील स्टार प्रवीण जाधव, प्रदीप शेकूरवार, गोपाल चव्हाण, कुंदन तीवडकर,राहुल पाटील,संतोष जयस्वाल यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी "श्री बालाजी नगर" या नावामुळे परिसराची ओळख अधिक दृढ होईल तसेच नागरिकांमध्ये एकात्मता वाढीस लागेल, असा विश्वास व्यक्त केला. नागरिकांनीही या नामकरणामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक नागरिकांच्या पुढाकारातून करण्यात आले असून, शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.श्री बालाजी नगर नामफलकाचे अनावरण उत्साहात संपन्न

## क्रीडा भारती मुंबई महानगरातर्फे १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या कबड्डी प्रशिक्षण शिबिराचे शानदार उद्घाटन...!

महाराष्ट्र जीत

**मुंबई: (प्रतिनिधी केतन भोज) :** कबड्डी या देशी खेळाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि भावी आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याच्या उद्देशाने, क्रीडा भारती मुंबई महानगर यांच्या वतीने दि. १७ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे दिमाखदार उद्घाटन क्रीडा भारतीचे अखिल भारतीय सचिव श्री. राज चौधरी आणि प्रांत मंत्री श्री. बाळ धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या तीन दिवसीय शिबिरामध्ये मुंबई महानगरातील एकूण १०६ बाल खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये ६८ मुले आणि ३८ मुलींचा समावेश असून, त्यांच्यातील क्रीडा नैपुण्य विकसित करण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे.

अनुभवी प्रशिक्षक शिबीर प्रमुख सौ.



सिमरत गायकवाड आणि सुनील खोपकर यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षकांची मोठी फौज या मुलांवर मेहनत घेत आहे. यामध्ये प्रामुख्याने: उपाध्यक्ष: रवींद्र करमळकर, कार्यवाह: श्री. प्रताप परब, प्रशिक्षक गट: पोर्णिमा राणे, सरिता कदम, योगेश कोकाटे, सरला खरात, वैशाली सावंत, विनीता गुजर, अर्चना गोऊळकर, बुशरा अन्सारी, प्रनिल पानवलकर आणि संतोष साळकर यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विठ्ठल जाधव आणि डॉ. प्रागजी वाझा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्याचा संकल्प

उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, कबड्डी आता केवळ मातीतील खेळ राहिला नसून त्याला जागतिक ग्लॅमर प्राप्त झाले आहे. १४ वर्षांखालील वयोगटातच मुलांवर योग्य संस्कार आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळाल्यास, भविष्यात हेच खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या शिबिरामुळे उदयोन्मुख खेळाडूंना नवीन तंत्रे शिकायला मिळत असून, क्रीडा प्रेमींकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# महावीर ब्रम्हचर्याश्रम मध्ये गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी संपन्न; जैन संत समंतभ्रद महाराजांच्या प्रतिमेच अनावरण

महाराष्ट्र जीत

**मनीष भेलांडे कारंजा** -गुरुकुल शिक्षण प्रणाली हि भारतातील अतिशय प्राचीन अशी शिक्षण पध्दती होती आजच्या स्पर्धात्मक व आधुनिक काळात ही काही ठिकाणी अस्तित्वात आहे तर काही ठिकाणी काळाच्या ओघात नष्ट झाली राज्यात आज ज्या काही गुरुकुल शिक्षण प्रणाली अस्तित्वात आहे त्यापैकी जैन संत परम पूज्य १०८ श्री गुरुदेव समंतभ्रद महाराजांच्या प्रेरणेने जैन धर्मातील पावन समजल्या जाणाऱ्या अक्षय तृतीया च्या पावन पर्वावर १९१८ साली स्थापन झालेले जैन गुरुकुल जी आजही १४ शाखेसारख्या वटवृक्षात दिमाखदार पध्दतीने उभी आहे त्यापैकी कारंजा लाड येथे महावीर ब्रम्हचर्याश्रम शाखा असुन या संस्थेला १०८ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भव्य तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

प पू जैन गणाचार्य विरागसागरजी महाराज यांची मंगल प्रेरणा तर प पू पट्टाचार्य विशुद्ध सागरजी महाराजांचा शुभाशीर्वाद व त्यांचेच शिष्य प पू विशुद्ध रत्न श्रमण श्री सुप्रभसागरजी महाराज , प्रणतसागरजी महाराज व क्षुल्लक श्री. १०५ विप्रज्ञसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात गुरूदेव श्री समंतभ्रद प्रणीत गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी व पुतळा अनावरण सोहळा श्री महावीर ब्रम्हचर्याश्रम परिसरात दि. १७ ते १९ एप्रिल रोजी संपन्न झाला.

दि १७ एप्रिल रोजी भगवान शांतीनाथ स्वामी पुजन पार पडले तद्नंतर म.ब आश्रम चे विश्वस्त राजाभाऊ डोणगावकर व हर्षल डोणगावकर यांच्याकडून भ. कुंदकुंददेव व आचार्य उमास्वामींच्या चरणपादुका विराजमान केल्या गेल्या दि. १८ एप्रिल रोजी प पू समंतभ्रद महाराज प्रणीत गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी व उदघाटन समारोहाचे आयोजन संपन्न झाले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून म ब्र आश्रम चे अध्यक्ष सतिश जी संगई तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीपाल सेठ बिलाला, दिनेशभाई गंगवाल व सुमितजी ठोले वेरुळ उपस्थित होते.

प्रथम सत्रात श्री म ब्र आश्रम स्थापनेपूर्वीची धार्मिक आर्थिक ,राजकीय पार्श्वभूमी या विषयांवर मान्यवरांनी




अतिशय अभ्यासपूर्ण माहिती विशद केली, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वाशिम येथील विद्यासागर गुरुकुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनोदजी गडेकर उपस्थित होते. तर प्रथम सत्राच्या दुसऱ्या टप्प्यात गुरुकुल व्यवस्थापन प्रणेते प पू गुरुदेव समंतभ्रद महाराज या विषयावर मार्मिक विवेचन पं श्री जितेंद्र जी राठी पुणे यांनी केले यावेळी अध्यक्ष म्हणून पं गुलाबचंद जी बोराळकर वेरुळ उपस्थित होते. व्दितीय सत्रात प पू गुरुदेव समंतभ्रद महाराजांचे शैक्षणिक विचार यावर प्रा डॉ पं नेमीनाथ शास्त्री संपादक सन्मति मासिक बाहुबली यांनी विचार मांडले, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा डॉ..महावीर मांगुळकर अकोला उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्यात प पु गुरुदेव समंतभ्रद महाराजांची गुरुकुल शिक्षण पध्दती ऐतिहासिक अभ्यास या विषयांवर प्रा श्रध्दाताई पंकज खंडारे नांदेड यांनी आपले मत व्यक्त केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आदिकुमार बंड अमरावती उपस्थित होते तर समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राजाभाऊ डोणगांवकर तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ प्रेमचंदजी पाटणी वेरुळ उपस्थित होते.

दि १९ एप्रिल रोजी सकाळी जेष्ठ जिनवर पूजा संपन्न झाल्यानंतर पुढील प पू मुनि महाराजांच्या पावन सानिध्यात व गुरुकुल चे माजी स्नातक व प्रमुख अतिथी विलासजी पाटणी, सतीशजी पेंढारी, अनिलजी झांझरी, मनोजजी कळमकर, जगदीशजी चवरे , अरुणजी आग्रेकर यांच्या हस्ते गुरुदेव समंतभ्रद महाराजांच्या प्रतिमेचे अनावरण संपन्न झाले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सतीश संगई उपस्थित होते. म ब आश्रम हायस्कूल भुमिपुजन सोहळा ही मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. शेवटच्या टप्प्यात म ब्र आश्रम माजी स्नातक स्नेह संवाद व बक्षिस वितरण डॉ नेमीनाथ शास्त्री बाहुबली यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात सतीश जी संगई यांनी म्हणाले की जैन गुरुकुल शिक्षण पध्दती मध्ये विद्यार्थ्यांना धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक , व्यायाम व मैदानी खेळासारखे परिपूर्ण शिक्षण दिले जाते याचा उद्देश एकच आहे की गुरुकुल मधुन शिकुन गेलेल्या विद्यार्थांच्या अष्टपैलुचा सर्वांगीण विकास व्हावा आणि हे केवळ गुरुकुल मधील शिस्त, अध्यात्म, चारित्र निर्माण व कौशल्यामुळेच शक्य असल्याचे सांगत जैन गुरुकुल चे माजी स्नातक आज मोठमोठ्या पदावर कार्यरत असून याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे सांगून संस्थेच्या आजपर्यंत च्या विकासात्मक कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित मान्यवर व राजाभाऊ डोणगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वस्त परिमल रुईवाले यांनी केले तर संचालन व आभार प्रदर्शन चिंतामण बुज, कविश गहाणकरी, पवन उखळकर, शुभांगी मरळे व रणजीत वाकळे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करीता विश्वस्त राजाभाऊ डोणगांवकर, सुहास चवरे ,भरत भोरे, प्रमोद चवरे , परिमल रुईवाले व उद्धर चवरे तसेच राहुल जैन व गुरुकुल चे शिक्षक वृंद , कर्मचारी वृंद व माजी स्नातक यांनी परिश्रम घेतले

## ठाणे पालिकेचा अजब कारभार: जनतेला पाणी बचतीचा ‘डोस’, तर साहेबांच्या फोटोंसाठी रस्त्यावर पाण्याचा ‘अपव्यय’!

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) ठाणे :** एकीकडे उन्हाच्या तीव्र झळा आणि धरणांतील खालावलेला पाणीसाठा पाहून सामान्य ठाणेकरांना “पाणी जपून वापरा” असा उपदेश देणारे ठाणे महानगरपालिका प्रशासन, दुसरीकडे मात्र स्वतःच पाण्याचा वारेमाप अपव्यय करताना दिसत आहे. शहरातील सर्व्हिस सेंटरवर बंदी घालून सर्वसामान्यांची अडवणूक करणाऱ्या प्रशासनाने, आज बाळकूम परिसरात नेत्यांच्या उपस्थितीत रस्ते धुण्याचा ‘स्वच्छता इव्हेंट’ राबवल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वीच महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि आयुक्त सौरभ राव यांनी शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर १०





जूनपर्यंत सर्व्हिस सेंटरमध्ये वाहने धुण्यावर कडक निर्बंध लादले आहेत . “अंगण धुवू नका, गाड्या धुवू नका, पाण्याचा पुनर्वापर करा” असे आवाहन करणाऱ्या प्रशासनाचा आज बाळकूममध्ये वेगळाच अवतार पाहायला मिळाला असल्याने पाणी कपातीचे निर्बंध फक्त सर्वसामान्यांसाठीच का ? असा प्रश्न यावेळी उपस्थित केला जात आहे.

आज प्रभाग क्रमांक ८ मध्ये आयोजित ‘सर्वंकष स्वच्छता मोहिमे’त उपमहापौर कृष्णा पाटील आणि स्थानिक नगरसेवकांनी हातात झाडू घेऊन फोटो तर काढलेच, पण त्यानंतर हाय-प्रेशर पाईपने रस्ते धुण्याचा सपाटा लावला. जरी पालिका हा ‘पुनर्वापर केलेला पाणीसाठा’ असल्याचा दावा करत असली, तरी ज्या काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, अशा वेळी केवळ प्रसिद्धीसाठी शेकडो लिटर पाणी रस्त्यावर ओतणे कितपत योग्य आहे? हा स्वच्छतेचा ‘शो’ की पाण्याची नासाडी? असा सवाल उपस्थित होत आहे.एकीकडे सर्व्हिस सेंटरचालकांनी गाड्या धुतल्या तर दंडात्मक कारवाई करायची परंतु प्रशासनाने आणि नेत्यांनी फोटो काढण्यासाठी रस्ते धुतले तर त्याला ‘स्वच्छता मोहीम ’ म्हणायचे ही दुटप्पी भूमिका नाही का?

“आम्हाला गाड्या धुवायला बंदी आणि साहेबांच्या स्वागतासाठी रस्ते चकाचक करायला पाणी कुठून येते ? ” असा संतप्त सवाल बाळकूममधील रहिवाशांनी विचारला आहे. पालिकेचे हे ‘दोन दात’ पाहून ‘लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण ’ अशीच अवस्था ठाणे महानगरपालिकेची झाली असल्याची टीका आता सोशल मीडियावरही होत आहे . प्रशासनाने जर खरोखरच पाणी टंचाईचे गांभीर्य ओळखले असेल, तर अशा ‘ओल्या’ स्वच्छता मोहिमांना फाटा देऊन केवळ कोरड्या स्वच्छतेवर भर का दिला नाही? याचे उत्तर आता आयुक्तांनाच द्यावे लागणार आहे.

## ‘कमवा आणि शिका’च्या मानधनाच्या दरांमध्ये वाढ

महाराष्ट्र जीत

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ‘कमवा आणि शिका’ योजनेंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या मानधनाचे दर आता तीन वर्षांनी वाढवण्यात येणार आहेत. त्यानुसार प्रतितास दहा रुपये मानधन वाढवण्यात येणार असून, वाढत्या महागाईच्या काळात शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.विद्यापीठाच्या संकुलातील शैक्षणिक विभागांसह विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतील महाविद्यालयांमध्ये कमवा




आणि शिका ही योजना राबवली जाते. या योजनेत विद्यार्थ्यांना प्रशासकीय किंवा अशैक्षणिक स्वरूपाची कामे दिली जातात. त्यासाठी ५५ रुपये प्रतितास या दराने मानधन दिले जाते. मात्र, या मानधनाचा दर वाढवण्याची मागणी विद्यार्थी संघटनांनी केली होती. नुकत्याच झालेल्या विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेवेळीही आंदोलन करून ‘कमवा आणि शिका’ योजनेच्या मानधनाच्या दरात वाढ करून प्रतितास ८० रुपये करण्याबाबतचे निवेदन देण्यात आले होते.या पार्श्वभूमीवर ‘कमवा आणि शिका’ योजनेच्या मानधनाच्या दरात वाढ करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती.


# बुलडाणा रिपाइंच्या वतीने दानशूर समाजसेवक रमेश अण्णा मुळे पाटील यांची रिपाइं मराठा आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल भव्य सत्कार

महाराष्ट्र जीत

**बुलडाणा (प्रतिनिधी)** – बुलढाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या वतीने समाजसेवक, दानशूर आणि लोकाभिमुख नेतृत्व असलेले रमेश अण्णा मुळे (पाटील) यांचा बुलडाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे जिल्हासंपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यातील रिपाई पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत असा काही धडाकेबाज सत्कार झाला की,सगळ्या संभाजीनर परिसरात चर्चा रंगली!

संभाजीनगर (औरंगाबाद) येथील पत्रकार परिषदेत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. रामदासजी आठवले यांनी १९ एप्रिल २०२५ रोजी दानसूर समाजसेवक रमेश मुळे (पाटील) अण्णांना महाराष्ट्र प्रदेश रिपाइं मराठा आघाडीच्या अध्यक्षपदी निवड जाहीर केली, व रिपाइंत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि तिथूनच राजकारणात एक वेगळाच रंग भरला.

मुळे अण्णा म्हणजे ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण अशी ओळख! मुळे फाउंडेशनच्या माध्यमातून गोरगरिब, निराधार, दलित, ओबीसी, मराठा, आदिवासी अशा सर्व समाजघटकांना मदतीचा हात देणारे हे


REPUBLICAN PARTY OF INDIA (ATHAVALE)
RAMDAS ATHAWALE National President
Head Office : 3/4, Insa Hutment, Azad Maidan, Fort, Mumbai - 400 001.

दिनांक:-२३.०४.२०२६

नियुक्तीपत्र

आयु. रमेश आण्णा मुळे, एन-२, सिडको, प्लॉट नं.६, छत्रपती संभाजीनगर आपली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या मराठा आघाडी प्रदेशाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. आपले सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदान तसेच पक्षाच्या व्यापकतेसाठी केलेल्या कार्याच्या अनुषंगाने आपली नेमणूक केली आहे.

आपण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा रिपब्लिकन पक्ष उभा करण्यासाठी तसेच समाजाच्या सर्वांगिण विकासाचे कार्य करुन रिपब्लिकन मराठी आघाडी व्यापक करण्यासाठी प्रयत्न कराल, ही आशा आहे. आपल्या पुढील राजकीय वाटचालीसाठी मंगलमय शुभेच्छा.

आपले,
(रामदास आठवले)

प्रत:-
आयु. राजाभाऊ सरवदे
प्रदेशाध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य.
श्री. बाबुराव कदम
कार्याध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य.

Resi. : Savindhan C.T.S. 647, Near Guru Nanak Hospital, Gandhi Nagar, Bandra - East, Mumbai - 400 051. Tel. : 022 - 26455164

व्यक्तिमत्व आज महाराष्ट्रभर चर्चेत आहे. कोरोना काळात त्यांनी केलेले काम तर अजूनही लोक विसरलेले नाहीत.ते चिरकाल आठवणी सारखे होते.

आता त्यांच्या हाती मराठा आघाडीची धुरा केंद्रीय मंत्री तथा रिपाईचे राष्ट्रीयध्यक्ष डॉ.रामदासजी आठवले यांनी दिली त्यांची निवड झाल्याबरोबर काय झालं?

तर अगदी जसं पहिला पाऊस पडतो आणि मृगनक्षत्राच्या मातीतून सुगंध दरवळतो, तसंच रिपाइंच्या संघटनेत एकदम नवचैतन्य उसळलं!

मराठा समाजाला रिपब्लिकन पक्षात भगव्या निळ्या एकत्र झेंड्याखाली आणण्यासाठी मुळे अण्णा आता जोरदार मैदानात उतरले आहेत. छत्रपती शिवाजी



महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालत असलेला मराठा-दलित-ओबीसी-मुस्लिम-अल्पसंख्याकांना एकत्र आणण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

व लवकरच दलीत मराठा ओबीसी मुस्लिम परिषदेचे आयोजन संभाजीनगर (औरंगाबाद) येथे होणार आहे. त्यावेळस महाराष्ट्राच्या राजकारणात नवी दिशा दिसेल व शोसलइंजिनेअरींगच्या माध्यमातून जिकडे डॉ,रामदास आठवले तीकडे राजकीय सत्ता असेल असे चित्र पूढील होऊ घातलेल्या लोकसभा विधानसभेत दिसेल व त्यावेळस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगीतले होते की, “शासन करती जमात बना” मुळे अण्णामुळे मराठा दलित एकत्र आल्यामुळे शासन करती जमात निर्माण होण्यास वेळ लागणार नाही लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाक्यांचे स्वप्न साकार होईल. अशा दानसुर समाजसेवक रमेश मुळे (पाटील) अण्णाचा

बुलडाणा जिल्हा रिपाइंच्या वतीने त्यांचा जल्लोषवाच्या वातावरणात भव्य दिव्य सत्कार शाल, पुष्पगुच्छ, पेढे वाटून बुलडाणा जिल्हा रिपाई पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सत्कार केला व आनंद व्यक्त केला.

> “दानशूर मुळे अण्णांच्या निवडीने रिपाइं आठवले गटाला नवचैतन्य; जसा पहिल्या पावसाच्या शेतावर पडणाऱ्या पाण्याचा सुगंध, तसा रिपाइंत उत्साह उफाळला !”

यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, जिल्हसंपर्क प्रमुख बाबासाहेब जाधव, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पॅंथर बाळकृष्ण इंगळे, मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. दिलीपदादा पाडमुख, समाजभूषण जेष्ठ नेते प्रा. इंजि. भैयासाहेब पाटील, बुलडाणा जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार, महिला अध्यक्ष वंदनाताई वाघ, युवाजिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील (म्हस्के), प्रसिद्धी प्रमुख वैभव शिरसाठ, विदर्भ उपाध्यक्ष संजय वाकोडे, भाऊसाहेब वानखडे, रामेश्वर वाकोडे, महिला उपाध्यक्ष आशाताई वानखेडे, दलितमित्र विजय सपकाळ, संघटक प्रमुख इंजि. शरद खरात, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नबाब मिर्झा बेग, महासचिव विजय साबळे, कार्याध्यक्ष प्रा. मुक्तार पठाण,

तसेच तालुकाध्यक्ष –

केशव सरकटे (बुलडाणा), बाळासाहेब आहिरे (मोताळा), हिम्मतराव जाधव (चिखली), भानुदास शेजूळ (सिंदखेडराजा), रमेश पिंपळे, पत्रकार विजय भालमोडे, युवानेते महेंद्र साळवे, राणा मोरे (मेहकर), राहूल आवसरमोल, दिलीप इंगळे (मलकापूर), निळकंठ सोनोने (खामगाव), बाबूलाल इंगळे (संग्रामपूर), संतोष वानखडे (जळगाव जामोद), शैलेश वाकोडे (नांदुरा), आकाश भैया साळवे (देऊळगाव राजा), सुधीरदादा हिवाळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

मुळे अण्णांची भूमिका

नियुक्तीनंतर मुळे अण्णा ठामपणे म्हणाले

“रिपाइंचं संघटन महाराष्ट्रात अधिक मजबूत करणार! प्रत्येक समाजघटकाला न्याय मिळवून देणं हेच माझं ध्येय असेल.”

लवकरच संभाजीनगर येथे मराठा-दलित-ओबीसी-मुस्लिम-अल्पसंख्याकांची भव्य परिषद घेण्याचा इशाराही त्यांनी दिला.

ही निवड म्हणजे फक्त पदवाटप नाही…

तर महाराष्ट्राच्या राजकारणात नवा खेळ, नवा वेग आणि नवं समीकरण!

मुळे अण्णांच्या नेतृत्वात रिपाइंला नवे पंख फुटलेत, आणि आता पक्षाची झेप आणखी उंच जाणार शासन करती जमात बनवणार हे नक्की.

मुळे अण्णाचे सर्व स्तरातून स्वागत अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. केंद्रीय मंत्री डॉ. रामदासजी आठवले यांनी योग्य मानसाची निवड केल्या बद्दल अभिनंदन होत आहे.